# महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ

**(स्वायत्त)** (ISO ९००१:२०१५) (ISO/IEC २७००१ : २०१३)

**शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४ था मजला, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०० ०५१.**

**दू.क्र.: ०२२-६२५४२१००/१५१**

**संकेतस्थळ : www.msbte.org.in** **ई-मेल : director@msbte.com**


**महत्वाचे परिपत्रक**

क्र. मरातंशिमं/का- ५०/सु.शै.वे./२०२०/ ९३६

दिनांक :- 11 AUG 2020

प्रति,

प्राचार्य,

मंडळाशी संलग्नित सर्व संस्था व स्वायत्त संस्था.

विषय :- **शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता सुधारीत शैक्षणिक वेळापत्रकाबाबत...**

संदर्भ :- १) मंडळाचे महत्वाचे परिपत्रक क्र. मरातंशिमं/का-२०/परीक्षा-२०२०/८३, दि. १५.०५.२०२०.

२) मंडळाचे महत्वाचे परिपत्रक क्र. मरातंशिमं/का-२०/परीक्षा-२०२०/२३२७, दि. ०८.०६.२०२०.

कोव्हिड १९ च्या प्रादुर्भावामुळे उद्‌भवलेली परिस्थिती व त्या अनुषंगाने झालेल्या टाळेबंदीमुळे मंडळाशी संलग्नीत पदविका अभ्यासक्रमाच्या परीक्षेचे नियोजन व शैक्षणिक वेळापत्रकाबाबत संदर्भ क्र. १ च्या परिपत्रकानुसार संस्थांना कळविण्यात आले होते. तसेच संदर्भ क्र. २ च्या परिपत्रकान्वये संदर्भ क्र. १ मधील मुद्दा क्र. १२ नुसार प्रस्तावित करण्यात आलेले शैक्षणिक वेळापत्रक विद्यार्थ्यांकरीता पुढील आदेशापर्यंत पुढे ढकलण्यांत येत आहे असेही कळविण्यात आले होते.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दि. ०७.०७.२०२० च्या पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चे सुधारित शैक्षणिक वेळापत्रकाबाबत कळविले आहे. सदर वेळापत्रकाप्रमाणे पदविका अभ्यासक्रमामध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांकरीता म्हणजेच तृतीय, पाचवे व सातवे सत्र व द्वितीय / तृतीय वर्षाचे वर्ग दि. १७.०८.२०२० पासून सुरु करण्याबाबत नमूद केले आहे. तसेच विद्यार्थ्यांसाठी वर्ग Online/Offline (Class Room) or Blended पध्दतीने कोव्हिड १९ च्या संदर्भातील मार्गदर्शक सूचनांचे पालन करुन घेण्याबाबत सुध्दा कळविले आहे.

मंडळाने दि. ०७.०७.२०२० च्या परिपत्रकान्वये सिव्हील इंजि., मेकॅनिकल इंजि. इलेक्ट्रीकल इंजि., इलेक्ट्रॉनिक्स इंजि. व कॉम्प्युटर इंजि. या पाच मुख्य अभियांत्रिकी ग्रुपमधील पहिले, तृतीय व पाचवे सत्रातील प्रत्येकी एक अशा नऊ विषयाचे E-content बनविण्याचे काम हाती घेतल्याचे कळविले आहे. तसेच केमिकल इंजि. टेक्सटाईल इंजि., प्लॅस्टिक व पॉलिमर इंजि., मायनिंग इंजि. व आठ अेआयसीटीई मान्यताप्राप्त वैविध्यपूर्ण (Diversified) शाखातील सुध्दा प्रत्येकी एका अशा सव्वीस विषयाचे E-content बनविण्याचे काम हाती घेतल्याचे संस्थांना कळविण्यात आले होते. याशिवाय उर्वरित विषयांच्या प्रथम दोन युनिटचे E-content माहितीपूर्ण असणे व त्यामध्ये एकसूत्रीपणा असणे, याकरिता मंडळामार्फत मार्गदर्शक तत्वे (Guidelines Document) देऊन, त्यानुसार संस्थास्तरावर E-content तयार करण्याचे सूचित केलेले होते. दि.३१.७.२०२० च्या परिपत्रकान्वये सर्व औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम राबविणा-या संस्थांना फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया यांच्या मार्गदर्शक तत्वांनुसार ऑनलाईन अध्यापनासाठी लागणारे E-content विकसित करण्याबाबत व त्याची अंमलबजावणी करण्याबाबत सुध्दा सूचित करण्यात आलेले आहे.

मंडळामार्फत तयार करण्यांत येत असलेल्या विषयांचे E-content संस्थाना उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. तसेच Online Teaching Learning सुकर होण्याच्या दृष्टीने मंडळामार्फत लर्निंग मॅनेजमेंट सिस्टीम (LMS) संबंधी विविध पर्याय तपासण्यात येत असून योग्य तो पर्याय संस्थांना स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

उपरोक्त नमूद वस्तुस्थिती तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे निर्देश विचारात घेता सर्व संस्थांनी Online/ Offline (Class Room) or Blended पध्दतीने शैक्षणिक कार्य दि. १७.०८.२०२० पासून सुरु करणे अपेक्षित आहे. मात्र केंद्र व राज्य शासनाचे प्रत्यक्ष शैक्षणिक संस्था दि. ३१.०८.२०२० पर्यंत बंद ठेवण्याचे निर्देश विचारात घेता सद्य:स्थितीत फक्त ऑनलाईन मोडमध्येच वेगवेगळया Online platform चा वापर करुन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक कार्य घेण्यात यावे. सदर ऑनलाईन वर्ग सुकर करण्याच्या दृष्टीने अध्यापक व विद्यार्थ्यांकरिता सुयोग्य पुरेशा सुविधा पुरविण्यात याव्यात. जे विद्यार्थी ऑनलाईन प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकत नाहीत अश्या विद्यार्थ्यांकरिता प्रत्यक्ष वर्ग सुरु झाल्यानंतर Remedial Choaching च्या माध्यमातून त्यांचे शैक्षणिक कार्य भरुन काढावे / पूर्ण करावे. प्रत्यक्ष संस्था सुरु झाल्यानंतर कोव्हिड १९ संदर्भातील केंद्र व राज्य शासनाने दिलेल्या निर्देशाचे पालन करुन संस्थेमध्ये प्रत्येक वर्गाच्या आवश्यकतेनुसार २-३ बॅचेस तयार करुन वेळापत्रकानुसार दिवसामध्ये वेगवेगळया वेळेमध्ये प्रत्यक्ष अध्यापन करावे.

संस्थेतील सर्व विद्यार्थ्यांपर्यंत Online शिक्षण पोहचविण्यासाठी संस्थांनी खालीलप्रमाणे नियोजन / उपाययोजना कराव्यात.

- संस्थास्तरावर Online अध्यापनाचे वेळापत्रक तयार करुन त्यांची अंमलबजावणी करावी.
- संस्थांनी Online अध्यापनाचे वर्गनिहाय, शिक्षकनिहाय, उपस्थित विद्यार्थी इ.बाबतच्या दैनंदिन नोंदी घेऊन सदर माहिती संस्थास्तरावर जतन करावी.
- Online अध्यापन सुकर होण्यासाठी आवश्यकतेनुसार विद्यार्थ्यांना Learning material soft copy मध्ये उपलब्ध करुन दयावे. (उदा. E-mail, WhatsApp द्वारे)
- संस्थेतील वर्गनिहाय Laptop/Desktop/Mobile उपलब्ध नसलेल्या विद्यार्थ्यांची Laptop/Desktop/Mobile उपलब्ध असलेल्या जवळपासच्या विद्यार्थ्यांशी एकत्रित online अध्यापनात सहभागी होण्यासाठी कम्युनिटी लर्निंगच्या धर्तीवर स्टडी ग्रुप करुन सांगड घालून देण्यात यावी.
- संस्थेत प्रत्यक्षात अध्यापन सुरु झाल्यानंतर संस्थांनी विद्यार्थ्यांसाठी नियमित कालावधीपेक्षा जास्त वेळ Lab/Computer center/Liabrary ची सुविधा उपलब्ध करुन दयावी.
- प्रत्यक्षात अध्यापन सुरु झाल्यानंतर Social distancing चे पालन करुन वेगवेगळया वेळामध्ये व बॅचेसमध्ये विद्यार्थ्यांची Theary / Practical घ्यावेत.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे शैक्षणिक कार्य दि. १७.०८.२०२० पासून संस्था स्थरावर योग्य नियोजन करुन सुरु करावे. सदरबाबतची अंमलबजावणी करण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थेच्या प्राचार्यांची राहील याची नोंद घ्यावी. तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या व शासनाच्या निर्देशानुसार शैक्षणिक नियोजनामध्ये काही बदल झाल्यास याबाबत परिपत्रकाद्वारे कळविण्यांत येईल.

विरजाधव

( वि. र. जाधव )
प्र. सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ,मुंबई

प्रत माहितीकरिता :-
उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/औरंगाबाद/नागपूर.